# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १९.०२.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. १८/०२/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३०५ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,४९,८५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. १८/०२/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन २१.०५ लिटर दारू असा एकुण ५,०५०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. १८/०२/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०४ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ५,३३०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अपघात दाखल गुन्हे:—**

दि.१८/०२/२०२३ रोजी पोस्टे कळमनुरी येथे अपघाताचा ०१ गुन्हा कलम २७९,३३७,३०४ (अ) भादवी प्रमाणे दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि. १८/०२/२०२३ रोजी पोस्टे हिंगोली शहर येथे ०१ इसमाविरूध्द कलम ४/२५ भाहका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले असुन पुढील तपास पोलीस करित आहेत.

**फसवणुक संदर्भाने दाखल गुन्हे :—**

दि.१८/०२/२०२३ रोजी पोस्टे हिंगोली शहर येथे ०१ गुन्हा कलम ४१७, ४१९, ४२०,४६८,१७०,३४ अन्वये प्रमाणे दाखल होवुन यातील नमुद आक्र ०१ याने अतिरिक्त जिल्हाधीकारी नसतांना अतिरिक्त जिल्हाधीकारी असल्याचे खोटे सांगितले तसेच कोणत्याही प्रकारची रजीस्टर बॅक नसतांना आक्र ०२ व ०३ यांच्या मदतीने फिर्यादीकडुन फिक्स डिपॉजीट करण्यासाठी म्हणुन त्याच्या कडुन एकुन १४,२७,७०० रू घेवुन त्याची फसवणुक केली म्हणुन गुन्हा दाखल. होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**दुखापत दाखल गुन्हे:—**

दि. १८/०२/२०२३ रोजी पोस्टे बासंबा व वसमत शहर येथे प्रत्येकी ०१ असे एकुण ०२ कलम ३२४,५०४,५०६ भादवी कलमान्वये दाखल असुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**सरकारी कामात अडथळा निर्माण करनाणाऱ्या विरूध्द दाखल गुन्हे :—**

दि. १८/०२/२०२३ रोजी पोस्टे हिंगोली ग्रामीण येथे कलम ३५३, ३७९, ३२३, १४३, १४७,१४९ भादवी सहकलम ४८(७)(८) म.ज.म.अधि कलमान्वये दाखल असुन यातील आरोपीने गैर कायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी व साक्षीदार हे गौणखणीज वाळु ची तपासणी करत असतांना आरोपी गौण खनीज वाळुची चोरी करीत असतांना पकडले असता त्यांनी त्यांच्यावर हल्ला करून गौण खनीज वाळु तेथेच टाकुन रिकामा ट्रॅक्टर ट्रॉली सह घेवुन पळुन गेले व इतर आरोपी मोसावर बसुन पळुन गेले व फिर्यादी व साक्षीदाराचे सरकारी कामात अडथळा निर्माण केला म्हणुन गुन्हा दाखल होवुन संदर्भात पोलीस तपास करित आहेत.